**रे.मु.नं. ८१/२००८**

नि.क. ८६/क

वादीतर्फे सा.क्र. ३ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नाव – मच्छिंद्रनाथ माया सिद्धी

माझे वय – ६२ वर्षे,

व्यवसाय – सेवानिवृत्त

राहणार – रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड

**<u>वादीतर्फे साक्षीदार यांचा सरतपास वकील श्री. यांच्यामार्फत....</u>**

१. सन २०१० मध्ये मी निमतानदार १ या पदावर ता.भू. अ. कार्यालय उरण येथे कार्यरत होतो. न्यायालयाने कोर्ट कमिशनर म्हणून केगाव येथील स.नं. १८६/६ ची मोजणी करण्याबाबत नेमले होते. मला आदेश प्राप्त झाल्यानंतर मी वादी व प्रतिवादींना नोटीस काढल्या. त्यांना नोटीसा रजि. पोस्टाने पाठवल्या होत्या. दिनांक २१.०१.२०११ रोजी मी वाद मिळकतीत जाउन वादी व प्रतिवादी समक्ष मोजणी केली. मी प्लॅनटेबल पद्धतीने मोजणी केली. मोजणी नकाशा आता मला दाखवण्यात आला. त्याची क प्रत मी न्यायालयात सादर केलेली आहे. क प्रत मी अ प्रतीवरून तयार केलेली आहे. त्याची अ प्रत आज मी न्यायालयात आणलेली आहे. क प्रतीमधील सर्व नोंदी अ प्रतीमधील नोंदीप्रमाणे बरोबर आहेत. क प्रतीवर माझी सही आहे. तसेच त्यावर मुख्यालय सहाय्यक व उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या सह्या आहेत. मोजणी नकाशा **<u>नि.क्र. ८७</u>** वर आहे. वाद मिळकतीमध्ये मला पाच झोपड्या आढळून आल्या. नंबर २ ने निर्देशित केलेली झोपडी प्रतिवादीची आहे व इतर बांधकामे आहेत.

**<u>साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्रीमती प्रधान यांच्यामार्फत...</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकतीच्या सातबाराच्या उता–यावर मालकी हक्क सदरी वादीचे नाव नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने वाद मिळकतीमध्ये त्याच्या वहिवाटीबाबत कोणताही पुरावा दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, वादीने दाखवलेल्या खुणांव्यतिरीक्त इतर कागदोपत्री पुरावा वादीच्या वहिवाटीबाबत मला मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खुणा फक्त वादीने दाखवल्या. प्रतिवादीने मला खुणा दाखवून वादीची वहिवाट दाखवली. हे म्हणणे खरे आहे की, मी नकाशात दाखवलेली बांधकामे कोणाची आहेत हे दर्शवण्याकरीता कागदोपत्री पुरावा हस्तगत केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीवरील बांधकामे किती जुनी आहेत याबाबत मी कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ वादी व प्रतिवादीच्या सांगण्यावरून खुणा व हद्दी निर्देशित केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीवर वादीची कोणतीही वहिवाट नसताना मी चुकीच्या नोंदी करून नकाशा तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (विकास डी. बडे)

दिनांक – ११.०९.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण